


# वंदे मातरम् गीताचा डॉ. मगदूम फार्मसी कॉलेजमध्ये जयघोष

**जयसिंगपूर/महान कार्य वृत्तसेवा**

वंदे मातरम् या गौरवशाली गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याने जयसिंगपूर येथील डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजच्यावतीने देशभक्तीपर वंदे मातरम् गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष कार्यक्रमामुळे महाविद्यालयाचे वातावरण देशभक्तीच्या भावनेने पसरले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. श्रेया मगदूम यांनी केले, तर प्रा. प्रणील तोरस्कर यांनी प्रास्ताविक सादर करून स्पर्धेचा उद्देश आणि वंदे मातरम् गीताचे १५० वर्षांचे महत्त्व स्पष्ट केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शितलकुमार एस. पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. विद्यार्थ्यांनी वैयक्तिक तसेच समूहगायनातून देशभक्तिपर गीतांचे अत्यंत प्रभावी सादरीकरण केले. या स्पर्धेत कु. श्रद्धा वाशीकर (बी.फार्मसी अंतिम वर्ष) हिने विजेतेपद पटकावले, तर कु. अर्जुन कुराडे (डी. फार्मसी प्रथम वर्ष) याला उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील यांच्या हस्ते विजेत्यांसह सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. प्रा. सौरभ समडोळे व प्रा. स्नेहल पाटील यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले होते. उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.